02 MAR 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अपघातावेळी 'मृत्युंजयदूत' देवदूत ठरतील

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के; महामार्ग पोलिसांतर्फे मृत्युंजयदूत योजनेचा प्रारंभ



उजळाईवाडी : हायवे मृत्युंजयदूत योजनेच्या प्रारंभप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. शेजारी जगन्नाथ जानकर, योगेश येळापुरे, डॉ. संदीप हजारे, डॉ. नायकवडी, अभय गायभये, श्रीमती पंडित मानसी आदी. (छायाचित्र : महादेव वाघमोडे)

**सकाळ वृत्तसेवा**

उजळाईवाडी, ता. १ : रस्ते अपघात रोखण्याची जबाबदारी वाहनधारक, पालक, शाळा महाविद्यालय, विद्यापीठे आणि पोलिसांची आहे. अपघातग्रस्ताला व जखमींना तातडीने उपचार मिळावेत म्हणून 'मृत्युंजयदूत' योजनेतील स्वयंसेवक जखमींना आवश्यक मदत करतील, यामुळे अपघातग्रस्तांच्या मृत्यूचे प्रमाण कमी होऊन 'मृत्युंजय दूत' देवदूत ठरतील, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले. महामार्ग पोलिस मदत केंद्र, उजळाईवाडी येथे 'हायवे मृत्युंजयदूत' योजनेचे उद्घाटन आज त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

ज्योतिषतज्ज्ञ पंडित मानसी, पोलिस निरीक्षक योगेश येळापुरे, जगनाथ जाणकर, सुरेश नलवडे, सुरेश शिरगुप्पी, राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय गायभये, डॉ.अनिल नायकवडी, डॉ.संदीप हजारे, अमर शितोळे, प्रवीण भालेराव पोलीस, डी. जी. माने, संपत माने, राजू गवाळकर आदी उपस्थित होते. सहायक पोलिस निरीक्षक जगनाथ जानकर यांचा पदोन्नतीबद्दल सत्कार झाला.

रस्ते वाहतूक सुरक्षा अभियानांतर्गत स्पर्धा झाल्या होत्या. त्यात सिम्बॉलीक इंटरनॅशनल स्कूल शिरोली, जोतिर्लिंग हायस्कूल वडणगे, माधवराव बागल हायस्कूल आदी शाळांतील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविले. राहुल देसाई यांनी प्रास्ताविक केले. मोहन सातपुते यांनी सूत्रसंचालन केले.

### राज्यव्यापी मृत्युंजयदूत योजना

रस्ते अपघातांत प्रति चार मिनिटाला एका व्यक्तीचा मृत्यू होतो. वेळीच उपचार व मदत न मिळाल्यामुळे अनेकांचा मृत्यू होतो. हा मृत्यूदर कमी करण्यासाठी अतिरिक्त पोलिस महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांच्या संकल्पनेतून 'मृत्युंजय दूत' ही योजना आकारास येत असून यात महामार्गावरील प्रत्येक गावातील किमान पाच स्वयंसेवकांना अपघातग्रस्तांना तातडीची मदत देण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण व साहित्य देण्यात येणार आहे. यात प्रथमोपचाराचे प्रशिक्षण तसेच स्ट्रेचर ,प्रथमोपचार साहित्य व ओळखपत्र देण्यात येईल. चांगले कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांचा गौरवही होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
02 MAR 2021 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हा

# विद्यापीठाची वाटचाल 'नॅक ए प्लस'च्या दिशेने

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन करण्यासाठी १५ ते १७ मार्च दरम्यान नॅक बेंगलोरची पिअर टीम विद्यापीठात येणार आहे. २०१४ साली विद्यापीठाला 'नॅक ए' मानांकन मिळाले होते. सध्या विद्यापीठाच्या यशाचा चढता आलेख पाहता संशोधन, सामाजिक कार्य, दर्जेदार अभ्यासक्रम यावर भर दिला आहे. विद्यापीठनेही रंगरंगोटी करण्यापेक्षा गुणात्मक दर्जा वाढवण्यावर भर दिला आहे. त्यामुळे विद्यापीठाची वाटचाल 'नॅक ए प्लस' मानांकनाच्या दिशेने आहे, अशी चर्चा विद्यापीठ वर्तुळात आहे.

शिवाजी विद्यापीठाचा सेल्फ स्टडी रिपोर्ट (एसएसआर) नॅक मूल्यांकनाच्या दृष्टीने अतिशय उत्कृष्ठ आहे. विविध सात मुद्यांवर गुणांकन केले जाते. यात ७० टक्के हे संख्यात्मक माहितीला तर ३० टक्के गुण हे गुणात्मक दर्जासाठी असतात. संशोधन, परदेशी विद्यापीठांशी सामंजस्य करार, रूसा अंतर्गत उपक्रम, एनआरआयसारखी विविध मानांकने यातूनच विद्यापीठाचा गुणात्मक दर्जा वाढल्याचे लक्षात येते. विज्ञान विभागासह यंदा अर्थशास्त्र विभागानेही संशोधन क्षेत्रात विद्यापीठाचे नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे. 'लोककला संवर्धन' केंद्र स्थापन करून लोककलेचा वारसा पुढे नेण्याचे काम विद्यापीठ करीत आहे. अत्याधुनिक क्रीडा साहित्य, कुस्ती स्पर्धा व राज्य पातळीवरील क्रिकेट स्पर्धेने क्रीडा विभागाच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे. गझल महोत्सवाने विद्यापीठाच्या सांस्कृतिक विभागाचा झेंडा लावला आहे.

पुस्तकांचे संगणकीकरण, कॅशलेस व्यवहार करून पर्यावरण संवर्धनावर भर दिला जात आहे. विद्यापीठ परिसरातील जैवविविधता विद्यापीठाच्या यशात महत्वाचा भाग ठरतेय. विद्यापीठातील १० विहरी, १२ तळ्यांच्या माध्यमातून केलेले स्वतंत्र पाणी व्यवस्थापनाने राज्यासमोर आदर्श घालून दिला आहे.



## उत्कृष्ट सामाजिक कार्य

कोल्हापूरवर महापुराचे संकट कोसळल्यानंतर विद्यापीठाने मदतीचा हात पुढे करीत पूरग्रस्तांना निवारा केंद्र, जेवणाची व्यवस्था, शहरातील लोकांना पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा दिला. दुष्काळी भागातील जनावरांसाठी चारा पुरवला. तर कोरोना कालावधीत कोविड केअर सेंटरच्या माध्यमातून अनेकांचे प्राण वाचवण्यास मदत केली. स्वच्छता अभियानामध्ये हिरीरीने भाग घेत शहरातील प्रमुख स्थळांची व पुतळ्यांची स्वच्छता केली. सर्व अध्यासन केंद्रांच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्य केले जाते.

## संशोधनात विद्यापीठ अव्वल

पन्हाळ्याचे अवकाश संशोधन केंद्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, सूक्ष्म जीवशास्त्र विभागातील संशोधकांनी केलेल्या दर्जेदार संशोधनांनी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. परदेशी करारातंर्गत विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या ज्ञानाची देवाण-घेवाण केली जाते. विद्यापीठ स्वनिधीतून संशोधनासाठी अनुदान देते.

## सर्वांच्या मदतीने नॅकची तयारी

विद्यापीठातील सर्व अधिविभाग, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी यांच्या मदतीने नॅकचे पुढचे मानांकन मिळवण्यासाठी युद्ध पातळीवर तयारी सुरु आहे. अधिविभागांचे नॅक प्रेझेंटेशन उत्कृष्ठ झाले आहे. दररोज बैठका घेऊन आढावा घेतला जात आहे. गुणात्मक वाढीवर भर दिल्यामुळे पुढील नॅकची मानांकन मिळेल अशी आशा आहे.

डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरु शिवाजी विद्यापीठ

02 MAR 2021
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या सत्रातील परीक्षा २२ पासून

## ओएमआर शीटचा वापर : परीक्षा नियोजन समितीची शिफारस

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा दि. २२ मार्चपासून सुरू करण्यात याव्यात. ऑनलाइन, ऑफलाइन पद्धतीने होणाऱ्या परीक्षांसाठी ओएमआर शीटचा वापर करावा. प्रात्यक्षिक परीक्षा दि. २१ मार्चपूर्वी विद्यापीठातील अधिविभाग आणि महाविद्यालयांनी पूर्ण कराव्यात, आदी विविध शिफारशी विद्या परिषद सदस्या डॉ. मेघा गुळवणी यांच्या अध्यक्षतेखालील विद्यापीठ परीक्षा नियोजन समितीने सोमवारी केल्या.

या हिवाळी सत्रामध्ये कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेच्या विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर सत्रातील एकूण ६२१ परीक्षा होणार आहेत. त्यात प्रथम वर्षाच्या परीक्षांची संख्या १०० आहे. ८० टक्के अभ्यासक्रमावर परीक्षा घेण्याचे नियोजन विद्यापीठाने यापूर्वी केले आहे. या विविध अभ्यासक्रमांच्या लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षांचे वेळापत्रक, त्यांचे स्वरूप, पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या परीक्षांची (पान ८ वर)

### ५० गुणांच्या वस्तुनिष्ठ पेपरसाठी एक तास

या परीक्षांसाठी २५ वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा ५० गुणांचा पेपर (प्रश्नपत्रिका) असेल. ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने होणाऱ्या परीक्षेसाठी एक तासाची वेळ असणार आहे. इंजिनिअरिंग, फार्मसी, लॉ, मॅनेजमेंट, शिक्षणशास्त्र, आर्किटेक्चर या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने होतील. त्याची जबाबदारी शाखानिहाय प्रत्येकी एका महाविद्यालयांकडे देण्यात येईल.

> बारावीची परीक्षा सुरु होण्यापूर्वी पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्याच्यादृष्टीने वेळापत्रक निश्चित केले जाईल. आमच्या समितीने घेतलेले निर्णय, केलेल्या शिफारशींचा अहवाल विद्यापीठाला सादर केला आहे. - डॉ. मेघा गुळवणी, अध्यक्ष, विद्यापीठ परीक्षा नियोजन समिती



### आकडेवारी दृष्टिक्षेपात

- परीक्षांची संख्या : ६२१
- विद्यार्थ्यांची संख्या : सुमारे २ लाख

## विद्यापीठाच्या परीक्षा २२पासून

(पान 1 वरून) जबाबदारी निश्चिती करण्याबाबत गुळवणी समितीची सोमवारी विद्यापीठात बैठक झाली. तोंडी, प्रात्यक्षिक परीक्षा ऑफलाइन का ऑनलाइन यापैकी ज्या पद्धतीने शक्य होईल तशी विद्यापीठातील अधिविभाग, संलग्नित महाविद्यालयांनी २१ मार्चपूर्वी घ्यावी. पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या परीक्षा अधिविभाग, महाविद्यालयांनी त्यांच्या पातळीवर घ्याव्यात. अभ्यासमंडळांनी प्रश्नपत्रिका तयार कराव्यात. या प्रश्नपत्रिका आणि त्या सोडविण्यासाठी ओएमआर शीट विद्यापीठाकडून पुरवाव्यात या शिफारसी विद्यापीठाला गुळवणी समितीच्या बैठकीत केल्या.

यावेळी डॉ. गुळवणी, डॉ. एच. एन. मोरे, जी. एस. गोकावी, एस. बी. भांबर, डी. एच. दगडे, पी. बी. चव्हाटे, जी. आर. पळसे आदी उपस्थित होते.



कोल्हापुरातील पंचगंगा बँकेच्या सुवर्णमहोत्सवाच्या प्रारंभ कार्यक्रमामध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पोलीस निरीक्षक तानाजी सावंत, पी. एल. जगताप उपस्थित होते.

# दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांना पंचगंगा बँकेची घरपोच सेवा

## राजाराम शिपुगडे : सुवर्णमहोत्सवी प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पंचगंगा बँकेच्या वतीने दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना घरपोच सेवा देण्याचा निर्णय बँकेचे अध्यक्ष राजाराम शिपुगडे यांनी जाहीर केला. बँकेच्या देवकर पाणंद शाखेत सुवर्णमहोत्सवी प्रारंभाच्या कार्यक्रमामध्ये ते बोलत होते.

सुवर्णमहोत्सवी प्रारंभाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शहर उपनिबंधक पी. एल. जगताप, राष्ट्रपती पदक विजेते पोलीस निरीक्षक तानाजी सावंत यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम झाला. जीवनधारा ब्लड बँकेच्या सहकार्याने १०० पेक्षा अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक फडणीस यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष राहुल भोसले यांनी आभार मानले. यावेळी बँकेचे संचालक पी. एस. कुलकर्णी, विकास परांजपे, दिगंबर जोशी, चंद्रशेखर धर्माधिकारी, उपेंद्र सांगवडेकर, संदीप पाटील, भालचंद्र साळोखे, विजय चव्हाण, विवेक शुक्ल, डॉ. माधुरी कुलकर्णी, वृषाली बंकापुरे, महाव्यवस्थापक सुशील कुलकर्णी यांच्यासह सभासद, ग्राहक उपस्थित होते. (वा. प्र.)

पुढारी

# ऑनलाईन अर्ज भरण्यास प्रारंभ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या प्रथम वर्ष, प्रथम सत्र नियमित विद्यार्थी व थेट द्वितीय वर्षाकरिता प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस सोमवारपासून प्रारंभ झाला.

विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने यापूर्वीच ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० परीक्षेच्या अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर केल्या आहेत. महाविद्यालय स्तरावर ऑनलाईन अर्ज प्रक्रिया राबविली जात आहे. विद्यार्थ्यांना मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी अपडेट करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ८ मार्चपर्यंत नियमित शुल्कासह विद्यार्थ्यांना महाविद्यालय, अधिविभागात अर्ज भरता येणार आहे. परीक्षेसंदर्भातील अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

पुढारी

# बी.ए., बी.कॉम. बी.एस्सी.च्या २२ मार्चपासून परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्यासाठी विद्या परिषदेने दिलेला निर्णय कायम ठेवत २२ मार्चपासून बी.ए., बी.कॉम. बी.एस्सी.च्या परीक्षा वस्तुनिष्ठ पद्धतीने तर इंजिनिअरिंग, लॉ, फार्मसीच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने घेण्याचा निर्णय डॉ. मेघा गुळवणी यांच्या अध्यक्षतेखाली परीक्षा नियोजन समितीच्या बैठकीत घेण्यात आला. विद्यापीठ परीक्षांच्या अनुषंगाने डॉ. गुळवणी समितीची सोमवारी बैठक झाली. परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने ८० टक्के अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा घेण्यास मान्यता देण्यात आली. विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरल्यानंतर परीक्षेचे नियोजन करण्याबाबत चर्चा झाली. पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षा अधिविभाग, महाविद्यालय स्तरावर घेतल्या जाणार आहेत. प्रात्यक्षिकसह इतर परीक्षा २२ मार्चपूर्वी पूर्ण करण्याबाबत निर्णय झाला.

02 MAR 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ परीक्षा वस्तुनिष्ठ पध्दतीने

## परीक्षा नियोजन समितीच्या बैठकीत निर्णय : २२ पासून पदवीधरच्या परीक्षेला प्रारंभ



**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ परीक्षा ऑफलाईन आणि ऑनलाईन पध्दतीने घेण्यासाठी विद्या परिषदेने दिलेला निर्णय कायम करीत, २२ मार्चपासून बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी.च्या परीक्षा वस्तुनिष्ठ पध्दतीने तर इंजिनिअरींग, फार्मसी, लॉ, आर्किटेक्चर, एज्युकेशन, मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने घेण्यास मान्यता देण्यात आली, असा निर्णय डॉ. मेघा गुळवणी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परीक्षा नियोजन समितीच्या बैठकीत घेण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन पध्दतीने घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये विद्यार्थी कोणता पर्याय निवडतात हे परीक्षा अर्ज भरुन पूर्ण झाल्यानंतरच समजणार आहे. त्यामुळे परीक्षा अर्ज भरून पूर्ण झाल्यानंतरच परीक्षेचे नियोजन केले जाणार आहे. २२ मार्च रोजी परीक्षा सुरू होणार असल्याने त्यापुर्वी २१ मार्चपर्यंत तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक (प्रॅक्टीकल) परीक्षाही ऑफलाईन आणि ऑनलाईन पध्दतीने घेतल्या जाणार आहेत. ८० टक्के अभ्यासक्रमावरील लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ पध्दतीने असल्याने ५० गुणांसाठी २५ प्रश्न विचारले जाणार आहेत. एका प्रश्नाला २ गुण असून, सर्व प्रश्न सोडवणे बंधनकारक आहे. विद्यापीठ प्रश्नपत्रिका, ओएमआर सीट पुरवणार आहे. पदविका (डिप्लोमा) अभ्यासक्रमाच्या परीक्षा अधिविभाग किंवा महाविद्यालयाने घ्यावयाच्या आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरून पूर्ण झाल्यानंतर संबंधीत विषयांच्या प्राध्यापकांकडून प्रश्नपत्रिका तयार करून घेतल्या जाणार आहेत. त्यामुळे प्रश्नपत्रिका, ओएमआर शीट तयार करण्यात किमान दहा ते पंधरा दिवसाचा कालवधी जाणार आहे. परंतू २२ मार्चपूर्वी परीक्षेची पुर्ण तयारी केली जाणार आहे.

**आजपासून परीक्षा अर्ज भरण्यास प्रारंभ**

शिवाजी विद्यापीठातील परीक्षांचे अर्ज भरण्यास आजपासून सुरूवात झाली आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालय, अधिविभाग १ ते ८ मार्चपर्यंत नियमित शुल्कासह अर्ज भरावयाचे आहेत. १० ते १३ मार्च विलंब शुल्क व १६ ते १८ मार्च अतिविलंब शुल्कासह अर्ज भरावयाचे आहेत. त्यानंतरच किती विद्यार्थ्यांनी ऑफलाईन आणि ऑनलाईन अर्ज भरला हे स्पष्ट होईल.